# सहकाराच्या माध्यमातुन रोजगार निर्मीती

**ए.एम. वानखडे**

एस.एस.एस.के.आर.ईन्नानी महाविद्यालय कारंजा (लाड)

## सारांश

*जगामध्ये आज बेराजगारीची समस्या भेडसावत असुन आपल्या देशामध्ये हया समस्येने मोठे रूप धारण केलेले आहे आणि ह्याचे अनेक कारणे सुध्दा आहे. परंतु ही समस्या सतत वाढतच राहील्यास किंवा त्यावर उपायाला प्राधान्य न दिल्यास देशाचा विकास होणार नाही म्हणुन हया समस्येचे निराकरणकर करण्याकरीता स्वय–रोजगाराची निर्मिती करणे, रोजगाराची निर्मीती करणे ह्या करीता बेरोजगाराच्या सेवा सहकारी संस्थेच्या माध्यमातुन कशे शक्य होऊ शकते ह्याची माहिती सदर लेखाव्दारे करीत आहे.*

## प्रस्तावना

## समस्या, कारणे

आजच्या आधुनीक युगाच्या काळात रोजगाराचा सर्वात महत्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. आणि आपल्या देशात तर म्हणजे भारतीय अर्थ व्यवस्थेत सध्या च्या स्थीतीत बेरोजगाराची समस्या फार मोठा आणि गंभीर प्रश्न निर्माण होत आहे. आधुनिक आजच्या काळात तंत्रज्ञानामुळे देशाची प्रगती होतांना दिसत असली तरी त्याच बरोबर बेरोजगारी ही सुध्दा उग्र रूप धारन करीत आहे. असे दिसुन येते याचे किंवा ही समस्या निर्माण होण्याचे अनेक कारणे आहे. त्यापैकी महत्वाचे म्हणजे लोकसंख्येची वाढ. 2011 च्या जनगनणेनुसार भारताची लोकसंख्या 121 कोटीवर पोहचली असुन दरवर्षी साधारणपणे 2 ते 2.5 टक्यानी ह्यात वाढ होत आहे. म्हणजे दरवर्षी 1.50 कोटीची त्यात भर पडत आहे. त्यात महत्वाचे म्हणजे आपल्या देशातील एकून श्रमीकांपैकी 65 टक्के श्रमिक शेतीव्यवसायत काम करतात आणि 70 टक्के जनतेचा चरितार्थ शेतीवर अवलंबुन आहे परंतु ह्या श्रमीकान पैकी 25 टक्के श्रमीक हे छुप्या बेरोजगारीत मोडतात म्हणजे त्यांची उत्पादन क्षमता ही शुन्य आहे. रोजगारीची संधी नसल्याने हा प्रश्न निर्माण झाला. तसेच जागतीकीकरण, यांत्रीकीकरण व सगंनकाच्या वाढत्या वापरामुळे दिवसेन दिवस रोजगाराची संधी कमी होत चालली आहे. अश्या ह्या महत्वाच्या बाबीचा गांभीर्याने विचारकरणे व त्याच्या निराकरणासाठी प्रयत्न करणे, उपाय करणे महत्वाची बाब आहे. नाही तर अनेक मोठ्या समस्या निर्माण होतील.

## महत्व, फायदे, उपाय

संयुक्त राष्ट्र संघटनेने सुध्दा जगातील ह्या समस्याकडे लक्ष वेधले आणी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सर्व साधारण सभेमध्ये ह्या रोजगारीच्या निर्मीतीवर विचार करूण संयुक्त राष्ट्र सघटनेच्या जीनेव्हा येथील सर्व साधारण सभेत सामाजीक विकासासाठी जागतिक करार करून सहकारातुन रोजगार निर्मिती हा विषय निवडला. आणि सन 1995 मध्ये कोपरहेगन येथे कृती कार्यक्रम तयार करून सहकारी क्षेत्राच्या माध्यमातुन शहरी व ग्रामीण भागात रोजगार निर्मीतीत भर दिला त्यामुळे जगामध्ये सुध्दा सहकाराच्या माध्यमातुन ही रोजगाराची समस्या मोठ्या प्रमानात दुर होऊ शकते व एकत्रीक कार्य केल्याने स्वयंरोजगार संधी प्राप्त केली जाऊ लागली व रोजगार निर्मीतीसाठी सहकाराचे महत्व वाढेल. आपल्या देशामध्ये सहकाराला अत्यंत महत्वाचे स्थान असुन महाराष्ट्राचा ह्या क्षेत्रामध्ये देशात प्रथम क्रमांक लागतो. महाराष्ट्र शासनाने बेरोजगारीचा प्रश्न सोडविण्या करीता (वरील देशातील रोजगारीची

समस्या लक्षात घेऊन) 2001 पासुन बेरोजगाराच्या सेवा सहकारी संस्था स्थापन करून या बेरोजगार सेवा सहकारी संस्थेच्या माध्यमातुन बेरोजगाराना स्वयरोजगार मीळवूण देण्याचे कार्य सुरू केले आहे. बेरोजगारानां स्वयं रोजगाराकडे वळविने हे धोरण राबवुन स्वयरोजगार हा रोजगाराला पर्याय म्हणुन पुढे आला आहे. तसेच बेरोजगाराच्या समस्या सोडविण्याकरीता सहकाराच्या माध्यमातुन एकत्रीत प्रयत्नांची जाणीव लक्षात घेऊन एकी हेच बळ सहकारातुन परीवर्तन करून बेराजगाराना एकत्रीत करून विविध प्रकारे बेरोजगाराच्या सेवा सहकारी संस्था स्थापन करून या संस्थे मार्फत विविध स्वयम रोजगार उद्योग सुरू करण्याची संधी निर्माण झाली आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये अशा 20 हजार संस्था स्थापन झाल्या असुन ह्या सहकारी संस्थेच्या माध्यमातुन विविध कार्य केली जात आहे. जसे दैनंदिन सेवा पुरवणे, उपकरणाची दुरूस्ती करणे, ड्रायव्हर, ईलेट्रानीक, मोबईल, टि.व्ही., रेफ्रीजेटर, संगणक, प्रींन्टर दुरूस्ती करणारे कारागीर एकाच ठीकानहुन उपलब्ध होऊ लागले तसेच त्या संस्थेच्या माध्यमातुन सबंधीत सभासद व्यक्तीना वन रोपन, बांधकाम, कालवे तयार करण्याचे ठेके मीळू लागले. महामंडळ, ग्रामपंचायत, महापालीका यांची ठेके सुध्दा प्राधान्याने ह्या संस्थेला मीळू लागले या मुळे अशा प्रकारे मोठया प्रमाणात अशा सहकारी संस्था निर्मान झाल्यास बेरोजगारीला मोठया प्रमाणात आळा बसेल. विकसनशील देशात राष्ट्रीय उत्पादनात सेवा क्षेत्राचा वाटा 62 टक्के आहे त्यामुळे ह्या क्षेत्रात सुध्दा रोजगाराची संधि अधीक जास्त प्रमाणात उपलब्ध होईल आणि सेवा क्षेत्राच्या वाटयामध्ये वाढ होईल. अशा प्रकारे ह्या बेरोजगाराच्या सेवा सहकारी संस्थेस विविध प्रकारची कामे मोठया प्रमाणात उपलब्ध करून दिल्यास त्यांना सेवा करण्याची संधी उपलब्ध होउन बेरोजगाराची मोठी समस्या सुटण्यास मदत होईल.

## निष्कर्ष

आजच्या अधुनीक युगाच्या काळात सुध्दा जो बेरोजगारीचा प्रश्न अतीशय गंभिर निर्माण झाला आहे हा प्रश्न सोडण्याकरीता आपल्या देशामध्ये, आपल्या राज्यामध्ये जे प्रयत्न बेरोजगाराच्या सेवा सहकारी संस्थे मार्फत केले जात आहे ते अत्यंत महत्वाचे कार्य असुन त्यातुन बेरोजगाराणा आशेचा किरण मीळून रोजगाराची संधी व स्वावलंबनाची दिशा मिळते आहे या मुळे मोठया प्रमाणात अश्या संस्थेची स्थापना करूण त्यांना प्राध्यान्याने काम करण्याची संधी दिल्यास बेरोजगाराची प्रश्न सुटण्यास निश्चीत मदत होईल.

## संदर्भ ग्रंथ

**डॉ. स. श्री. मु. देसाई, डॉ. निर्मल भालेराव, (2011).** “भारतीय अर्थव्यवस्था”, निराली प्रकाशन, पुणे.

**डॉ. पी.बी.पाटिल, (2013).** “सहकार प्रादेशीक सहकारी मंडळ”, पुणे.

**सहकारी विदर्भ मासीक प्रकाशन, (2012).** विदर्भ विभागीय सहकारी बोर्ड अमरावती.

**सहकारी विदर्भ मासीक प्रकाशन, (2013).** विदर्भ विभागीय सहकारी बोर्ड अमरावती.

**प्रा. दाभजी, प्रा. भोसले, (2007).** “सहकार”, फडके प्रकाशन कोल्हापुर.